# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

**Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere**

विद्याविहार,लोणेरे-रायगड ४०२ १०३(महाराष्ट्र)Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)

Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140-275212

Website: www.dbatu.ac.in, E-mail: coe@dbatu.ac.in

**परीक्षा विभाग**

**Dr. Geetanjali Mahamunkar** डॉ. गितांजली महामुणकर

**Controller of Examination (i/c)** परीक्षा नियंत्रक (प्र.)


दिनांक: २८/०७/२०२६

**परिपत्रक :**

विषय : परीक्षाविषयक तक्रारी / अडचणी केवळ तक्रार निवारण पोर्टलद्वारे (**Grievance Portal**) स्वीकारण्याबाबत.

सर्व विद्यार्थ्यांना व क्षेत्रीय केंद्रांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, गुणपत्रिका (**Marksheet**), प्रमाणपत्रे (Certificates) व इतर परिक्षाविषयक समस्यांविषयीच्या तक्रारी अनेक माध्यमांतून (ई-मेल, फोन, संदेश व ऑफलाईन अर्ज) प्राप्त होत आहेत. यामुळे तक्रारींचे वेळेत निवारण करणे आणि विद्यार्थ्यांपर्यंत त्याचा पाठपुरावा (Status Update) पाहोचविणे यात अडचणी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्व तक्रारींचा निपटारा त्वरीत, पारदर्शक व वेळेत व्हावा यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र 'तक्रार निवारण पोर्टल' (**Grievance Portal**) सुरु केलेले आहे.

परंतु, अद्यापही अनेक विद्यार्थी मुख्य परिसर किंवा क्षेत्रीय केंद्रांवर प्रत्यक्ष येऊन अर्ज सादर करीत आहेत. यामुळे प्रशासकीय कामावर ताण येत असून तक्रार निवारणाच्या प्रक्रियेत विलंब होत आहे.

यास्तव, विद्यापीठ प्रशासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :

- केवळ ऑनलाईल तक्रारी : दिनांक २९/०७/२०२६ पासून परीक्षा विषयक कोणत्याही प्रकारची तक्रार / अर्ज केवळ विद्यापीठाच्या अधिकृत तक्रार निवारण पोर्टलद्वारेच स्वीकारला जाईल.
- ऑफलाईन अर्जावर विचार नाही : मुख्य परिसर किंवा कोणत्याही क्षेत्रीय केंद्रांवर प्रत्यक्ष (ऑफलाईन) सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- तक्रारीची स्थिती (**Status**) : पोर्टलवर तक्रार नोंदविल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या तक्रारीचा अनुक्रमांक (Ticket/Token Number) मिळेल, ज्याद्वारे त्यांना अर्जाच्या सद्यस्थितीची (Resolution Status) माहिति घरबसल्या पहाता येईल.

महत्वाची नोंद : तक्रार नोंदविण्यासाठी कृपया विद्यापीठाच्या अधिकृत '**Grievance Portal**' संकेत स्थळाला **https://dbatu.cems.co.in/grievance/** भेट देऊन या पर्यायाचा वापर करावा.

या निर्णयामुळे परीक्षा विभागाला प्रत्येक प्रकरणावर जलद गतीने कारवाई करणे आणि विद्यार्थ्यांना योग्य व वेळेत अपडेट देणे शक्य होईल. सर्व विद्यार्थ्यांनी या नवीन व्यवस्थेची नोंद घेऊन सहकार्य करावे.

Dr. B. A. TECHNOLOGICAL UNIVERSITY Lonere Raigad (M.S.)

परीक्षा नियंत्रक

Controller of Examinations
Dr. Babasaheb Ambedkar Technological University
Lonere-402103
Tal. Mangaon, Dist. Raigad (Maharashtra)